# बजाज इलेक्ट्रिकल वानखेडे स्टेडियम उजळविणार

मुंबई, ता. १२ : उपखंडात २०११ मध्ये होणाऱ्या विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेच्या यजमानपदासाठी नव्याने तयार होत असलेले वानखेडे स्टेडियम विद्युत प्रकाशझोतांनी उजळविण्याचे काम बजाज इलेक्ट्रिकल कंपनीला मिळाले आहे.

वानखेडे स्टेडियमवर विद्युत प्रकाशझोत बसविण्याचे मिळालेले काम आमच्यासाठी प्रतिष्ठेचे आहे. क्वीन नेकलेस समजला जाणारा मरीन लाईन्स आणि गिरगाव चौपाटी तसेच मुंबईचे आभूषण ठरलेल्या वांद्रे-वरळी सागरी सेतूवरही विद्युत प्रकाशझोताचे



**हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवरही विद्युत प्रकाशझोताचे काम बजाजनेच केलेले आहे.**

काम आम्ही केले आहे याचा आम्हाला अभिमान आहे, असे मत बजाज इलेक्ट्रिकलचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक शेखर बजाज यांनी व्यक्त केले.

वानखेडे स्टेडियमचे नूतनीकरण लार्सन ॲण्ड टुब्रोतर्फे केले जात आहे. काही प्रेक्षक स्टॅण्ड दोन मजली आहेत, त्यावर विद्युत प्रकाशझोताचे खांब उभारणे कौशल्याचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे दिवे बसविण्यात येणार आहेत.

वानखेडे स्टेडियमवरील विद्युत प्रकाशझोत बसविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. बजाज, फिलिप्स, जीई आणि क्रॉम्प्टन यांच्यात स्पर्धा होती, त्यानंतर शॉर्टलिस्टमध्ये बजाज आणि फिलिप्स यांच्यातच स्पर्धा उरली होती, अखेर मुंबई क्रिकेट संघटनेने बजाजला प्राधान्य दिले. आयसीसीच्या नियमाप्रमाणेच हे दिवे बसविले जातील, असे बजाजकडून स्पष्ट करण्यात आले. दोन टप्प्यांत हे काम करण्यात येणार असून, स्टेडियम पूर्ण झाल्यावर दिवे बसविण्याचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे.

बजाज इलेक्ट्रिकलने हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम तसेच इंदूरमधील उषा राजे क्रिकेट स्टेडियममध्येही विद्युत प्रकाशझोत बसविला आहे.